# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 19.07.2012 (का.प.क्र.-06) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त,**

**शुक्रवार दिनांक 19.07.2012 रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.35 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला आयुक्त, श्री.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से, प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
03. स. श्री.आगा खान मिया खान
04. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
05. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
06. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
07. स. श्री. खान अक्रम करीम खान
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
10. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

**श्री.समीर राजुरकर :** मागील दोन बैठकींमध्ये लाईटच्या बीओटीबाबत चर्चा करण्यात आली होती. पांढऱ्या बीओटी लाईटचे ऑडिट करण्यासाठी मागील बैठकीत सांगण्यात आले होते. सेव्हणहील उड्डाणपुल एमएसआरडीसीकडे असुन त्यावर एकही लाईट सुरू नाही. त्याबाबतीत महापालिकेने पाठपुरावा करण्याची गरज आहे. सामान्य नागरीकांना हे माहित नाही की सदरील उड्डाणपुल कोणाकडे आहे. हया पांढऱ्या बीओटी लाईटचे ऑडिट झाले पाहिजे. मा.तत्कालिन आयुक्त श्री.असिमकुमार गुप्ता यांनी करार करतांना बेंच मार्क करून दिला होता. त्या बेंचमार्कला फॉलोअप केला जात आहे.

**मा.सभापती :** सेव्हणहिल उड्डाणपुल हस्तांतरण झाले आहे का? तेथील अपघात होण्याची शक्यता असल्याने सर्व पोल काढले होते. मनपाकडे असेलतर पर्यायी व्यवस्था काय केली खुलासा करण्यात यावा.

**कार्य.अभियंता (विद्युत) :** सेव्हण हिल उड्डाणपुल येथील सर्व पोल काढण्यात आलेले आहे. ते एमएसआरडीसीने तयार करून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. पोल पडत असल्याने सर्व पोल काढण्यात आले. नविन पोल लावण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. नविन पोल महानगरपालिकेतर्फे लावण्यात येणार आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य :** पोल काढल्याची दिनांक काय आहे.

**कार्य.अभियंता (विद्युत) :** कमीत कमी दोन महिने झाले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :औरंगाबाद शहर पर्यटन स्थळ म्हणुन मानण्यात येते. महत्वाचा पुल आहे. लाखो वाहने त्यावरुन ये जा करत असतात. अशा पध्दतीने पुलाची दुरावस्था करून ठेवल्यास शहरात पर्यटक येणार नाही. अंदाजपत्रक तयार करण्यास जास्त वेळ लागत आहे. खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता (विद्युत) :अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. बजेटची समस्या आहे. बजेटचे अलोकेशन झाल्यास टेंडर कॉल करण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :पुलावर रात्री महिलांचे मंगळसुत्र चोरी, अपघात, मृत्युमुखी पडणारे नागरीक ही सर्व जबाबदारी मनपाने घ्यायची का? का एखादी मोठी घटना घडु द्यायची. बीडबायपासचे हस्तांतरण झालेले आहे का? अमरप्रीत ते बीडबायपास पर्यंत हस्तांतरण केलेले आहे का?

कार्य.अभियंता (विद्युत) : बीडबायपासचे हस्तांतरण झालेले नाही. अमरप्रीत ते बीडबायपास पर्यंत हस्तांतरण केलेले नाही.

श्री.समीर राजुरकर :दुरूस्ती कोणामार्फत केले जाते.

कार्य.अभियंता (विद्युत) : दुरूस्ती त्यांचेमार्फत केले जाते.

श्री.समीर राजुरकर :संबधीत विभागास लाईट बंद असल्याबाबत पत्रव्यवहार, पाठपुरावा प्रशासनाने करण्यात यावे. तेथे नागरीकांची वर्दळ असते दिड दिड महिना त्या ठिकाणी लाईट बंद असतात. लाईटच्या तक्रारी कमीत कमी कशा होतील याबाबत प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. पांढऱ्या लाईट बाबत मा.तत्कालिन आयुक्त श्री.असिमकुमार गुप्ता यांनी करार करतांना बेंच मार्क करून दिला होता. त्या बेंचमार्कला फॉलोअप केला जात आहे का?

कार्य.अभियंता (विद्युत) :सन 2007 मध्ये बेंचमार्क तयार करण्यात आले होते. 950 वॅटचे 9 दिवे 11 तास लावण्यात आले त्याची रिडींग कॅलक्युलेट करण्यात आल्यानंतर 28 युनिट येत आहे. 1 दिव्याचे एक दिवसाचे कॅलक्युलेट 3.11 Per Unit येत आहे. 30 दिवसांचे कॅलक्युलेट केलेले आहे. 96 वॅट 4 बाय 24 त्याचे कॅलक्युलेट केलेले आहे. त्याचे 10 युनिट येत आहे. 950 वॅटचे 9 पथदिवे एक दिवसासाठी लावण्यात आलेतर 10.5 वॅट एक पथदिव्याचा एक दिवसाचा युनिट कॅलक्युलेट केल्यास 1.17. त्याच्यामध्ये डिफरन्स 3.11 - 1.17 ते आपल्याकडे सेव्हिंग येते. इंजिनिअर कॉलेजचे बेंचमार्क आपल्याकडे लावण्यात आलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :ऑडिटची फ्रेम मा.सभापती यांचेकडे देण्यात यावी. राज्यशासनाच्या नियमाप्रमाणे लाईनमन यांना सुपरवाईझरची वेतनश्रेणी लावण्यात आलेली आहे. तीन विभाग महानगरपालिकेत सक्षम असायला पाहिजे. विद्युत, ड्रेनेज, पाणीपुरवठा. मनपामध्ये लाईनमन यांचेकडून हेड करून त्यांचे हाताखाली लाईनमन देवुन काम करावे. जेणेकरून नागरीकांना नगरसेवकांना त्रास होणार नाही.

मा.सभापती :सेव्हनहिल उड्डाणपुल दोन महिण्यांपासून बंद आहे. वर्तमानपत्रात टेंडर आलेले आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा. सदरील उड्डाणपुलावरून नागरीक/महिला जाऊ शकत नाही. 45 मीटरचा व्हिआपी रोड बंद राहत आहे. संबधीत विभागाला पत्र देवुन मेंन्टनन्स बाबतीत कळविणे आवश्यक आहे. शहरातील लाईट सुरू करण्याबाबत आदेशीत केले होते त्याबाबतीत खुलास करावा.

कार्य.अभियंता :बीओटीचे मेन रोडचे काम हाती घेतलेले आहे. लाईट सुरू केलेले आहे.

श्रीमती प्राजक्ता राजपुत:शहरातील मुख्य रस्त्यावरील लाईट बंद आहे. मिलकॉर्नर ते भाजीमंडई पर्यंत सर्व लाईट बंद आहेत. तेथुन पुढे गुलमंडी पर्यंत सर्व लाईट सुरू आहे. गेल्या दोन बैठकीपासून प्रशासनाच्या निर्दशनास ही बाब आणुन देण्यात येत आहे. काहीही कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :स.सदस्या श्रीमती प्राजक्ता राजपुत यांच्या वार्डातील लाईट त्वरीत सुरू करण्यात यावे.

श्री.विजेंद्र जाधव :लाईनमनच्या ऑर्डरबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता (विद्युत) :लाईनमनच्या ऑर्डर काढण्यात आलेल्या आहेत.

मा.सभापती :याबाबतची माहिती प्राप्त झालेली नाही. मोबाईल क्रमांकसहीत यादी देण्यात यावी.

श्री.विजेंद्र जाधव :वार्ड वाईझ टेंडर घेतलेले आहे. परंतु संपर्क साधला असता सदरील काम आमच्याकडे नाही म्हणुन सांगण्यात येते.

मा.सभापती :99 नगरसेवकांना ठेकेदाराचे लाईनमनचे नांव मोबाईल क्रमांक देण्यात यावे. 99 नगरसेवकांना याबाबतीत तातडीने पत्रव्यवहाराने माहिती कळविण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :हिमायतबाग ते सत्यविष्णु हॉस्पीटल, अण्णाभाऊ साठे चौकापर्यंतचे लाईट, गणेश कॉलनी ते टि.व्ही.सेंटरचा मेनरोडचे लाईट बंद अवस्थेत आहे. याबाबतीत प्रशासनाला वारंवार सांगण्यात आले आहे. परंतु काहीही कार्यवाही झालेली नाही. भारतमाता नगर येथील कॉपऱ्यावरील टपरीवर अंधाराचा फायदा घेऊन टोळके आले होते त्यांना हाकलण्यात आले.

उपअभियंता (विद्युत) :लाईनमन श्री.सपकाळ आहे. त्यांना ऑर्डर दिलेली आहे. स्वाक्षरी आणण्यास सांगण्यात आलेले आहे.

मा.सभापती :स्थायी समितीच्या 16 सदस्यांचे स्वाक्षरी घेतलेली नाही. एका लाईनमनला 3 वार्ड देण्यात आलेले आहे. त्यानंतरही काम केले जात नाही. प्रशासनाने वैयक्तिक लक्ष देऊन लाईनमन यांना ऑर्डर देण्यात याव्या. ज्यांची त्या दिवशी सही नाही त्यांची अनुपस्थिती टाकण्यात यावी.

शहर अभियंता :संबधीत लाईनमन यांना दालनात बोलावुन लेखी तसेच तोंडी सांगण्यात आले, समजवण्यात आले. यानंतर त्यांचेवर ॲक्शन घेण्यात येईल. पगार थांबविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

लाईनमन यांना सुपरवाइझरपदी पदोन्नती देण्याची प्रक्रीया करावी लागेल.

श्री.आगा खान मिया खान: लक्ष्मणचावडी ते एमजीएम येथील रस्ता रूंदिकरण केल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण होत आहे. प्रशासकीय अधिकारी वार्डात येऊन जातात परंतु काहीही कार्यवाही होत नाही. यामुळे वार्डात काम करतांना अडचणी येत आहे. अतिक्रम कार्यवाही करतांना कर्मचारी नागरीकांना सांगतात की, स.नगरसेवकांनी सांगीतले आहे. सदरील विषय गंभिर स्वरूपाचा आहे. प्रशासकीय विभागास सक्षम अधिकारी देण्यात यावा. स.सदस्य श्री.संजय चौधरी यांनी अतिक्रमण विषयावर उपोषन केले होते. समस्या अधिकारी कर्मचारी यांची आहे. मोजणी करून दिल्यावर संबधीतास सांगण्यात आले की, 58 फुट पुढे आलेले आहे. प्रशासकीय विभागातील कर्मचारी अतिक्रमण काढण्यासाठी गेले असता त्यांनी संबधीतास सांगीतले की, स.नगरसेवकानी अतिक्रमण काढण्यास सांगीतले आहे. प्रशासकीय अधिकारीपदी सक्षम अधिकारी देण्यात यावा नसता उपोषण करण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :प्रशासन प्रशासनाचे काम केले पाहिजे. बी.आय ला अनाधिकृत बांधकाम चालले असता ते त्यांनी निष्कासित केले पाहिजे. स.सदस्य श्री.संजय चौधरी यांच्या प्रकरणात मा.आयुक्तांनी 24 तासात अहवाल सादर करून तात्काळ कार्यवाही करा म्हणुन आदेश दिले होते. परंतु सदरील प्रकरणात सुर्योदय, सुर्यास्त झाला परंतु कार्यवाही झाली नाही. कोर्टातुन स्टे आणल्यावर जेसीबी त्या ठिकाणी उभे करायची. स.सदस्य उपोषनाला बसल्यानंतर 12.30 वाजता पत्र दिले नाही. 12.45 ला पत्र द्यायचे. 1 वाजता उपोषन सोडायचे 1.30 वाजता प्रशासकीय यंत्रणा पोहचायची आणि त्यानंतर त्या ठिकाणी स्टे आणला जातो. सदरील प्रकरणाची संचिका आणुन मा.आयुक्तांनी आदेश दिल्याची तारीख पहाण्यात यावी आणि स्टे किती तारखेला आला. ते तपासण्यात यावे. बी.आय. विभाग प्रमुखाला अतिक्रमण पाडण्याबाबत का माहिती देत नाही. समोरच्या व्यक्तीला स्टे आणु द्यायचा हे योग्य नाही. यामध्ये मनपाचे नुकसान आहे. यामध्ये का उशीर करण्यात आला यात दोषी कोण आहे. त्यांचेवर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :सदरील प्रकरणाशी संबधीत बी.आय.यांनी सविस्तर खुलासा करावा.

इमारत निरीक्षक (श्री.विधाते):विधी सल्लागार यांना संचिका पाठवुन दिली आहे.

मा.सभापती :अतिक्रमण आहे हे केव्हा समजले, त्या ठिकाणी बांधकाम चालू होते का?

इमारत निरीक्षक (श्री.विधाते):पोट्रीफॉमची बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. पोट्रीफॉमचे स्ट्रक्चर आहे.

श्री.समीर राजुरकर :सुर्यास्त शुक्रवारी झालेला होता. शनिवार,रविवार गेला सोमवारी कारवाई का केली नाही?

इमारत निरीक्षक (श्री.विधाते):सोमवारी कंम्पाउंड वॉल पाडण्याची कारवाई करण्यात आली.

मा.सभापती :बांधकाम व्यतिरिक्त काम आहे का? टि.पी.चा अहवाल घेण्यात आलेला आहे तो बरोबर आहे का?

इमारत निरीक्षक (श्री.विधाते):बांधकाम व्यतिरिक्त बांधकाम आहे. टि.पी.ने दिलेल्या अहवालाप्रमाणे बांधकामा व्यतिरिक्त बांधकाम तोडण्यास सांगितले आहे. एक कॅबिन आणि एक मॅक्झीन फ्लोअर आहे.

मा.सभापती :किती स्के.मि.चा आहे.

उपअभियंता(श्री.निकम):ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. तो नो डेव्हल्पमेंट झोन मध्ये आहे. नो डेव्हल्पमेंट झोन मध्ये पोल्ट्रीफॉम अलाऊड आहे. त्या प्रमाणे बिल्डींग परमिशन दिलेली आहे.

श्री.समीर राजुरकर :पोल्ट्रीफॉम म्हणजे आपण स्ट्रक्चर म्हणतो का? शेड म्हणतो? नो डेव्हल्पमेंट झोन मध्ये 12 मजली इमारत बांधायची का? की शेड बांधयचे.

मा.सभापती :पोट्रीफॉमचा कन्सेप्ट सांगण्यात यावा.

उपअभियंता(श्री.निकम):ज्या ठिकाणी कोंबडयांचा बिझनेस केला जातो त्यास पोल्ट्रीफॉम म्हणतात. त्या ठिकाणी शेड असणे आवश्यक आहे आणि शेडसाठीच परवानगी दिलेले आहे. अनवॉन्टेड काम काढुन टाकण्यासंबधी अहवाल दिलेले आहे.

मा.सभापती :कंम्पलिशन सर्टिफिकेट दिलेले आहे का?

उपअभियंता(श्री.निकम): माझ्या माहितीप्रमाणे कंम्पलिशन घेतलेले नाही. कंम्पलिशनसाठी संचिका दाखल झालेली नाही. कायद्याप्रमाणे कंम्पलिशन घेतली पाहिजे.

मा.सभापती :या संबधी पत्रव्यवहार केलेले आहे.

उपअभियंता(श्री.निकम): पत्र दिलेले नाही.

मा.सभापती :महानगरपालिकेतर्फे अनाधिकृत बांधकाम चालू असल्याबाबत पहाणी/तपासणी केलेली आहे.

उपअभियंता(श्री.निकम):प्रशासकीय विभागाकडून संचिका आल्यानंतर ताबडतोब ज्युनिअर इंजिनिअरने जाऊन विनापरवानगी बांधकाम त्वरीत काढण्यात यावा असा अहवाल दिलेला आहे.

मा.सभापती :According to drawing नुसार कोणकोणते बांधकाम विनापरवानगी आहे असा अहवाल दिलेला आहे का? आरआरसीचे स्ट्रक्चर तिथे आहे.

उपअभियंता(श्री.निकम):प्रत्येक बिल्डींग परमिशनची कॉपी प्रशासकीय विभागाला नकाशासहीत देत असतो. नकाशाव्यतिरिक्त काय बांधकाम चालू आहे हे इमारत निरीक्षक तपासणी करू शकतो. वास्तविक पहाता नगर रचना विभागाकडे संचिका पाठविण्याची आवश्यकता नाही.

मा.सभापती :प्रकरण गाजत असतांना टि.पी.चा एकही अधिकारी संबधीत ठिकाणी गेलेला नाही. बांधकाम अनाधिकृत असतांना भिंत तोडण्यात आली त्यादिवशी फ्लोअर का तोडण्यात आले नाही. मंगळवारी सकाळी कारवाई करण्यात का गेले नाही. स्टे आल्यानंतर कारवाई करण्यास गेले.

श्री.समीर राजुरकर :सुर्यास्त झालेला आहे. बांधकाम पाडता येत नाही. हे किती तारखेला बोलले.

इमारत निरीक्षक(श्री.विधाते):16 तारखेला.

श्री.समीर राजुरकर :14 तारखेला शुक्रवारी मा.आयुक्तांनी फोन करून बांधकाम पाडण्यास सांगण्यात आले. शनिवार,रविवार सुट्टी आली. सोमवारी जाऊन फक्त कंम्पाउंड पाडण्यात आले.

मा.सभापती :शहरातील रूंदिकरणाच्या वेळेस सुट्टीच्या दिवशी अतिक्रमण तोडण्यात आले. मग शनिवारी रविवारी कारवाई करायला हवी होती.

इमारत निरीक्षक(श्री.विधाते):सुट्टी असल्यामुळे जायचे नाही. असे म्हटले आहे.

मा.सभापती :रोड वाईडिंगचे सुट्टीच्या दिवशी तोडण्यात आले ते शहरातील नागरीक आहे. सदरील मालमत्ता लिगली होत्या.

श्री.समीर राजुरकर :नोटीस किती तासाची आणि केव्हा इश्यु केली.

इमारत निरीक्षक(श्री.विधाते):13 तारखेला .

मा.सभापती :13 तारखेला 24 तासाची मुदत होती.

श्री.समीर राजुरकर :14 तारखेला त्या ठिकाणी का गेले नाही. 24 तासात अतिक्रमण निष्कासित करायला हवे होते. भिंत कोणत्या वारी पाडण्यात आली.

इमारत निरीक्षक(श्री.विधाते):शुक्रवारी अर्ध्यी भिंत पाडण्यात आली आणि सोमवारी काही भाग पाडण्यात आला.

श्री.समीर राजुरकर :किती कि.मी.ची भिंत होती.

इमारत निरीक्षक(श्री.विधाते):12 आणि 15 फुटची भिंत होती.

मा.सभापती :12 फुट भिंत पाडणे जेसीबीसाठी महाग आहे.

श्री.समीर राजुरकर :कुणाच्या आदेशाने थांबविण्यात आले. 24 तासाची नोटीस दिली असतांना ते का पाडण्यात आले नाही. उपोषणाला बसणाऱ्या नगरसेवकाचे गांर्भिर्य नाही. दूपारी 12.30 वाजता स.नगरसेवकांच्या हातात विभाग प्रमुखाने पत्र दिले. मा.महापौर उपोषण सोडविण्यासाठी त्या ठिकाणी आल्यात. विभाग प्रमुखांनी मशीन पाठवा म्हणुन आदेश देण्यात आले. मशीन पोहचण्याच्या

पुर्वी स्टे आला. महानगरपालिका कोणासाठी चालू आहे. स.नगरसेवकांची काय गरज आहे अतिक्रमण पाडण्यासाठी उपोषनास बसण्यास, अतिक्रमण पाडण्याची / काढण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सेव्हण हिल उड्डाणपुलाच्या बाजुला भव्य अशा इमारतीचे बांधकाम चालू आहे. न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये निर्णय आलेला आहे की, संबधीत मालकाचे पीआरकार्ड रद्द करण्यात यावे. न्यायालयीन निर्णयाच्या कॉपीज विधी विभागाकडे आल्यानंतर नगर रचना विभागाकडे पाठविण्यात आल्या, सदरील जागेवर कुणाची मालकी आहे हे सध्या कळत नाही. कारण पीआर कार्ड रद्द करण्यात आलेले आहे. नगर रचना विभागाने संचिका प्रशासकीय विभागाकडे वर्ग केली आणि योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. संचिकेचा पुर्ण प्रवासाचा खुलासा सभागृहापुढे घेण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता(श्री.निकम):संचिका मागवुन खुलासा करण्यात येईल.

मा.सभापती :पीआरकार्ड रद्द झाल्यावर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली. मालकीच राहीली नसल्यास काय केले पाहीजे.

उपअभियंता(श्री.निकम):पीआर कार्ड रद्द झाल्यावर त्यात काही न्यायालयीन प्रक्रीया आहे काय यासाठी संचिका विधी विभागास पाठविण्यात आली आहे.

मा.सभापती :त्या दिवसापासून आजपर्यंत कोणती ॲक्शन घेण्यात आली.

उपअभियंता(श्री.निकम):दिनांक 29.05.2009 रोजी इमारत परवानगी देण्यात आली.

मा.सभापती :परवानगी आपोआपच रद्द झालेली आहे. त्याबाबतचे संबधीतांना पत्र देण्यात आलेले आहे का?

उपअभियंता(श्री.निकम):दरम्यानच्या काळात रिवाईझ परमिशन दाखल झाली होती. ती परमिशन सुध्दा नामंजूर केलेली आहे.

मा.सभापती :तीन वर्ष संपल्यानंतर पत्र व्यवहार केलेला आहे का.

श्री.रेणुकादास वैद्य :न्यायालयाने पीआर कार्ड रद्द केलेले आहे. परवानगीची मुदत संपलेली आहे. रिवाईझ परमिशन नामंजूर केलेली आहे. एवढा सर्व प्रकार घडल्यानंतर महापालिका म्हणुन काहीही कार्यवाही केलेली नाही. नोटीसही देण्यात आलेली नाही. यामध्ये टाऊन प्लॅनिंग आणि अतिक्रमण विभागातील अधिकाऱ्यांचे हात बरबरटलेले आहे. असे गांभिर्याने आणि जबाबदारीने सांगण्यात येते.

मा.सभापती :मालकी हक्क रद्द झाल्यावर प्रशासन काहीच कारवाई करत नाही. संचिका विधी विभाग आणि प्रशासकीय विभागात मुव्ह होत आहे.

सहा.संचालक न.र :बांधकाम परवानगी संपली आहे त्यामुळे बांधकाम पुढे करू नये. याबाबतचे पत्र देण्यात आलेले आहे.

मा.सभापती :संबधीत बी.आय.ला मी स्वत: फोन करून सांगण्यात आले की, बांधकाम चालू आहे. मालकी हक्क रद्द झालेली आहे. इमारत केव्हा तोडणार आहे. 24 तासाची नोटीस स्टे आणण्यासाठी देण्यात आली. प्रशासन काय कार्यवाही करणार.

सहा.संचालक न.र :बांधकाम परवानगी थांबविण्यासाठी दिनांक 06.07.2012 रोजी पत्र दिलेले आहे. 3 जी बांधकाम परवानगी दिलेली आहे. ती त्यांचे मालकी हक्क पीआरकार्ड बघुन देण्यात आलेली आहे. सिटी सर्व्हे विभागाने पीआरकार्ड रद्द केलेला असेल त्यांचेबद्दल त्यांचे काय म्हणणे आहे. हे ऐकुण मालकी

हक्क कोणाचा होईल याबाबत विधी विभागाकडुन माहिती घ्यावी लागेल. मनपाला कार्यवाही करावी लागेल. बांधकाम परवानगी थांबविलेली असतांना रद्द झालेली असतांना आपण बांधकाम का सुरू ठेवलेले आहे.

मा.सभापती :मालकी हक्काबाबत खुलासा करण्यात यावा. मालकी हक्क रद्द झाल्यानंतर महापालिका काय कार्यवाही करणार?

सहा.संचालक न.र :मालकी हक्क रद्द झाल्यावर महानगरपालिकेतर्फे कार्यवाही अपेक्षीत नाही. बांधकाम परवानगी ही त्यांची मालकी हक्क पाहुन देण्यात आलेली आहे. तो त्यांचा इश्यु आहे. यापुढे त्यांनी बांधकाम करू नये. याची दक्षता घेण्यात यावी.

मा.सभापती :जसास तसे ठेवावे लागेल का?

सहा.संचालक न.र :जसास तसे ठेवावे लागेल.

मा.सभापती :प्रशासनाकडुन परवानगी रद्द झाली म्हणुन का देण्यात येत नाही.

सहा.संचालक न.र :रद्द करणेबाबत पुढील पत्र देण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :मा.आयुक्त आणि पदाधिकारी यांनी सिटी सर्वे यांचेसोबत बैठक घेतली पाहिजे. महानगरपालिका ही एक Conform Authority असुन त्यांना विचारल्याशिवाय पुढील कार्यवाही करू नये. असे परिपत्रक आहे.

मा.सभापती :डिपी प्लॅन महानगरपालिका फॉलो करतो. शहरात ओपनस्पेसचे पीआरकार्ड आहे. त्यांना परवानगी देत नाही. डीपी प्लॅन/लेआऊट फॉलोअप केला जातो.

श्री.विजेंद्र जाधव :प्रशासकीय विभागास टेक्नीकली प्रशासकीय अधिकारी देण्यात यावे तसेच इमारत निरीक्षक यांचेवर कुणाचेही नियंत्रण नाही.

मा.सभापती :प्रशासकीय अधिकारी,इमारत निरीक्षक सक्षम असायला हवे. याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :अतिक्रमणाबाबत मा.सर्वसाधारण सभा आणि मा.स्थायी समितीमध्ये बऱ्याच वेळेला चर्चा झालेली आहे. सुचना आदेश दिलेले आहे. परंतु बऱ्याच प्रकरणांमध्ये अपेक्षित कार्यवाही करण्यात येत नाही. करण्यात आलेली नाही. मुदतीत होत नाही. रस्ता रूंदिकरणाचे काम केलेले आहे. नाले मोजणीचे काम चालू आहे. यामध्ये प्रशासकीय विभाग,विधी विभाग, टि पी विभाग प्रमुख म्हणुन सिडको म्हणुन काम आहे. श्री.काथार यांना अधिकार देण्यात आले होते परंतु काम व्यवस्थित होत नाही. नव्याने अधिकारी द्यावे लागतील. आज संध्याकाळपर्यंत दोन प्रशासकीय अधिकारी देण्यात येईल. चिकलठाणा येथे पोट्रीफॉमचे अतिक्रमण करण्यात आले होते. सहा महिण्यांपासून तक्रार समोर येत होती. कार्यवाही करण्यासाठी आदेशीत केले होते. मनपाची अतिक्रमणाची टिम त्या ठिकाणी गेली परंतु दिवस मावळला म्हणुन टिम वापस आली. दिवस होता सुर्यास्त झालेला नव्हता चांगल्यापैकी ऊन होते. सकाळी सुट्टीच्या दिवशी कार्यवाही अपेक्षित होती परंतु ती केली गेली नाही. ज्या ठिकाणी नागरीक राहातात त्या ठिकाणी दिवस मावळल्यावर अतिक्रमण काढत नाही. अनाधिकृत बांधकाम रात्री बारावाजता जरी काढले असते तरी काही बिघडले नसते. यामध्ये हलगर्जी झालेली आहे. याबाबत चौकशी करण्यात येईल. उपआयुक्त महसुल, शहर अभियंता आणि सहा.संचालक न.र. यांना सर्व बाबींची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेले आहे. पोट्रीफॉम ऐवजी शोरूम बांधलेली

असल्यास ही गंभिर बाब आहे. आयुक्तांवर येणारी बाब आहे. शासनही यासंबधी संवेदनशील आहे. कमिटीने तात्काळ अहवाल द्यावा व जे जबाबदार आहे त्यांचेवर केस दाखल करावी. सेव्हनहिल येथील बांधकामाबाबत सहा.संचालक न.र.यांनी तपासणी करून सायंकाळपर्यंत अहवाल देण्यात यावा. पीआरकार्ड रद्द झाल्यावर सदरील जागा महापालिकेची आहे काय? याबाबींचा शोध घेऊन तात्काळ अहवाल देण्यात यावा. योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. किराडपुरा येथे रस्ता रूंदिकरण झाले आहे. काही जणांनी स्टे आणलेला आहे. त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर वाहने लावली जातात ती हटविण्यात आलेली आहे. रस्ता रूंदिकरण केलेले आहे. त्याची पुन्हा मापे घेण्यात यावी. काही भाग राहिलेला आहे तो तोडण्यात यावा. मार्कींग करून अतिक्रमण काढण्यात यावी. किराडपुरा येथील नागरीकांना तसेच मछलीखडक येथील नागरीकांना बोलविण्यात आलेले आहे. त्यांना वेगळया पध्दतीने हाताळण्यात येईल.

मा.सभापती :रस्ता रूंदिकरणात मार्कींग करण्यात यावी. बॉन्ड्री फिक्स करण्यात यावी. साईड ड्रेन घेण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :इंदिरानगर उत्तर बायजीपुरा येथील नगरसेविका यांनी दिनांक 7.01.2011 रोजी गट नंबर 1 ते 19 भागात जे अतिक्रमण झाले आहे त्याची तक्रार रितसर देण्यात आलेली आहे.

इमारत निरीक्षक (श्री.आरेफ खान):सदरील तक्रार जुनी आहे. मी येऊन दिड महिना झालेला आहे. सदरील ठिकाणी स्वत: जाऊन पहाणी केलेली आहे ते ठिकाणी कंन्जेस्टेड व संवेदनशिल भाग आहे.

मा.सभापती :या संबधी पोलीस प्रोटेक्शनची मागणी करण्यात यावी.

इमारत निरीक्षक (श्री.आरेफ खान):पोलीस प्रोटेक्शन घेऊन कारवाईसाठी गेलो होतो. ड्रेनेज लाईनवर अतिक्रमण आहे. 11 घरांची समस्या आहे.

श्री.आगा खान मिया खान:लक्ष्मण चावडी ते एमजीएम येथील रस्ता रूंदिकरणात बाधीत झालेले नागरीकांच्या म्हणण्यानुसार नगसेवकाने मध्यस्ती करून या 12 ते 13 नागरीकांचा पुन्हा सर्वे करून प्रश्न सोडविण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :सदरील नागरीकांचे सुनावणी घेऊन प्रश्न सोडविण्यात यावा.

मा.सभापती :रस्ता रूंदिकरणात बाधीत काही नागरीकांनाही न्याय मिळाला पाहिजे. त्यांची प्रशासनाने सुनावणी घ्यावी.

श्रीमती प्राजक्ता राजपुत:सांस्कृतिक मंडळासमोरील फुटलेल्या ड्रेनेज लाईनबाबत अद्यापही काही कार्यवाही केलेली नाही.

श्रीमती सविता घडमोडे :माझ्या वार्डातही ड्रेनेजची गंभिर समस्या निर्माण झालेली आहे.

उपअभियंता(श्री.खमर) :सदरील स्थळाची पहाणी करून चोकअप काढण्यात आलेले आहे. सदरील लाईन ही 20 वर्षापुर्वीची असुन ती बदलणे गरजेचे आहे. त्यामुळे मिळालेल्या निर्देशाप्रमाणे 40 लाखाचे अंदाजपत्रक तयार करून लेखा विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे. सदरील लाईन कमी व्यासाची असुन 550 मीटरची आहे. त्यावर बोझा जास्त झालेला आहे.

श्री.समीर राजुरकर :रॉडिंग आणि बकेटिंग मशीन वापरून पहावे.

उपअभियंता(श्री.खमर) :याबाबतची निवीदा काढण्यात आलेली आहे. रॉडिंग मशीन दुरूस्त केलेली आहे.

श्री.समीर राजुरकर :1 कोटी 22 लाखाच्या रॉडिंग आणि बकेटिंग मशीन घेतलेल्या आहेत त्या तशाच पडुन आहेत (याबाबतचे वार्ड अ ते फ पर्यंतचे फोटो मा.सभापती यांचेकडे स.सदस्य सादर करतात) 13 व्या वित्त आयोगातुन त्या मशीन खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सोलापुर येथील श्री.अशोक हडा यांचेकडुन त्या मशीन खरेदी केलेल्या आहेत त्यांचेकडे एक वर्ष रॉंडींग आणि बकेंटींग करण्याचे काम होते. त्यासाठी ब आणि क चे 18 लाख रूपये आणि पुर्ण शहराचे 56 लाख रूपये बिल देण्यात आलेले आहे. 4 लाखाचे बिल बाकी आहे. एक वर्ष असतांना सदरील मशीन चालविण्याचे प्रशिक्षण मनपाच्या कर्मचाऱ्यांना का शिकविण्यात आले नाही. एकही मशीन वर्कींगमध्ये नाही. मशीन घेतल्यानंतर पद्मपुरा भागात क्लिअर करण्यासाठी बकेटींग टाकली असता ती त्यामध्ये फसली पुर्ण लाईन उघडुन लाईन फोडावी लागली. मा.सभापती यांनी सदरील मशीनची पहाणी करावी. सोलापुर महानगरपालिकेत एकही मशीन घेण्यात आली नाही. सव्वा कोटींच्या मशीन खरेदी करण्यात आल्या. 56 लाख रूपये मेंन्टनन्ससाठी देण्यात आलेले आहे व 4 लाख रूपये बिल अजुनही बाकी आहे. ड्रेनेज काढणारे मनपाचे कर्मचारी, जे.ई, उपअभियंता महानगरपालिकेचे एका वर्षात एकही माणुस ट्रेन केलेला नाही. महापालिकेचे प्रत्येक प्रोजेक्ट फेल होतात. सदरील प्रकरणाची संपुर्ण चौकशी करण्यात यावी.

श्री.नारायण कुचे :यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेत या विषयाची चर्चा केलेली आहे. सदरील मशीन सडलेल्या आहेत. टायर निकामी झालेली आहे यावर कुणाची जबाबदारी होती. याबाबतची 15 दिवसात संपुर्ण चौकशी करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अतिशय गंभिर प्रश्न उपस्थित केलेला आहे. 56 लाखाचे बिल दिलेले आहे. रॉडिंगने काम केलेल्या 56 लाखाच्या कामावर आपल्या ठेकेदारामार्फत काम करण्यात आले. अशा पध्दतीचे 56 लाखाचे नविन बिलअप झालेले आहे. सदरील बाबीची तपासणी करण्यात यावी. टाईमलिमीट ठेवुन चौकशी करण्यात यावा. यावर जो खर्च झाला तो त्यांचे पगारातुन वसुल करण्यात यावा.

श्री.नारायण कुचे :डबल बिल दिले त्याची चौकशी करण्यात यावी.

मा.सभापती :13व्या वित्त आयोगाची रक्कम नागरीकांसाठी नागरीकांच्य कामांसाठी खर्च झाली पाहिजे परंतु अशा पध्दतीने खर्च झालेले आहे. सर्व स.सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे मशीन खरेदी करणे गरजेचे होते काय? हिताचे होते का? सव्वा कोटी खर्च करूनही काहीही उपयोग नाही मशीन वापरात आणलेल्या नाही. कर्मचारी यांना प्रशिक्षण दिलेले नाही. रॉडिंग मशीन खरेदी बाबत संपुर्ण टाईम बॉन्ड चौकशी करून अहवाल सादर करण्यात यावा.

उपअभियंता(श्री.खमर):सांस्कृतिक मंडळासमोरील चोकअप वारंवार होत आहे ते काढण्यात येत आहे. पाईप कमी व्यासाचे आहेत. 20 वर्षापुर्वीचा लोड त्यावर होता आता तो लोड वाढलेला आहे तो लोड घेऊ शकत नाही. वाहिन्या बदलाव्या लागतील. अंदाजपत्रक सादर केलेले आहे. ते मंजूर करून पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

शहर अभियंता : सांस्कृतिक मंडळासमोरील चोकअप वारंवार होत आहे. लोड जास्त झ ाालेला आहे त्या लाईनला बदलणे आवश्यक आहे. 40 लाखाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

मा.सभापती :शहराचा मुख्य भाग आहे. गणपती सन जवळ येत आहे. बैठक झाल्यानंतर मा.आयुक्तांकडे जाऊन ताबडतोब निर्णय घेण्यात यावा.

श्री.विजेंद्र जाधव :स.नगरसेवकांनी माहिती विचारणा केल्यावर मा.आयुक्तांची परवानगी लागती का?

श्री.पाटणी(एलबीटी विभाग):स.सदस्यांनी छोटया आणि मोठया कंपण्या किती आहेत आणि ते सुरवातीस व आता किती एलबीटी भरतात याबाबत माहिती मागीतली होती. एकुण कंपण्यांची माहिती दिलेली आहे. एकुण किती कर वसुल केलेला आहे कंपण्यामार्फत याची माहिती दिलेली आहे. वैयक्तिक व्यापाऱ्याची फिगर ओपन करावयाची झाल्यास त्यासाठी नियम 53 अन्वये मा.आयुक्त महोदय यांची मान्यता त्या ठिकाणी असावी लागते.

श्री.रेणुकादास वैद्य :एलबीटी विभागाचे चांगले काम केले म्हणुन अभिनंदन केले आहे.

श्री.पाटणी(एलबीटी विभाग)162 कोटी रूपये 12 महिण्याचे उत्पन्न दिलेले आहे. 2 1/2 महिण्याचे जवळपास 40 कोटीचे उत्पन्न दिलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :चांगले उत्पन्न देत आहे त्यांचेकडे बसण्यासाठी जागा नाही. स्टाफ नाही. एलबीटी चालू असतांना जे दर जकातीचे आहे तेच एलबीटीचे असायला पाहिजे. राज्य शासनाला एक पत्र पाठवुन दिले त्याचेवरचा आकार 0.25 करावा . मनपाची जबाबदारी संपली मनपाने 0.25 ने आकारणी केली आहे. राज्यशासनाची परवानगी नाही. त्यांची परवानगी धरून केलेले आहे. सदरील विभागावर चर्चा करणेसाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी.

मा.सभापती :एलबीटी बाबतीत जी माहिती दिली ती अतिशय गंभिर बाब आहे. याबाबती स्वतंत्र बैठक लावण्यात येईल. 1 एप्रिल पासुन जीटीएलची परवानगी भेटलेली आहे शासनाची 2 टक्केंची वसुली केलेली आहे का?

श्री.पाटणी(एलबीटी विभाग):वसुल केलेली नाही. महाराष्ट्र शासनाने 1 एप्रिल 12 पासुन विद्युतवर 2 टक्के एलबीटी आकारण्याची परवानगी दिलेली आहे. परंतु अद्यापर्यंत भरणा केलेली नाही.

मा.सभापती :दर महिण्याला मनपा विज बील अदा केली जाते. 2 टक्क्यावर व्याज लावता येईल का?

श्री.पाटणी(एलबीटी विभाग): 2 टक्क्यावर विलंब आकार व्याज लावता येईल.

मा.सभापती :कारवाई करण्याचे नियम आहेत का?

श्री.पाटणी(एलबीटी विभाग):वार्षिक विवरणपत्र दाखल करण्याचे यामध्ये व्यवस्था केलेली आहे.

मा.सभापती :जो भरतच नाही तो रिर्टन काय दाखल करणार.

श्री.नारायण कुचे :नागरीकांनी दोन दिवस बील भरण्याच्या डेटनंतर भरले असता दंड लावण्यात येते.

मा.सभापती :शासनाचे जीआर आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :त्यांना कळविण्यात आलेले आहे का? एलबीटी आकारणी करणार आहे.

श्री.पाटणी(एलबीटी विभाग):कळविले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :त्या डेटपासून ते आजपर्यंत जे आऊटस्टँडिंग निघते ते काढण्यात यावे. मनपाच्या बिलातुन सदरील रक्कम वजा करण्यात यावी व उर्वरित रक्कम मनपा भरेल असे साधे पत्र त्यांना देण्यात यावे. जे एलबीटी भरत नाही तोपर्यंत लाईटबिलची भरणा करू नये.

मा.सभापती :वन टाईम सेटलमेंट केलेले आहे. राज्य शासनाने जीआर दिलेला आहे. दोन महिणे होऊनही उत्तर देत नाही. महानगरपालिकेला आलेल्या विद्युत बिलातुन जीटीएल कंपणीकडे मनपाची असलेली 2 टक्के एलबीटी वळती करणे बाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

तसेच रजिष्ट्री कार्यालयाकडे थकलेले रक्कम रूपये 8.00 कोटीच्या मागणीसाठी मा.जिल्हाधिकारी यांना तात्काळ पत्र व्यवहार करण्यात यावा. शहरात असलेल्या पेट्रोलपंपावरील डिझेल व पेट्रोलवर लावण्यांत येणाऱ्या वॅट मधुन मनपास किती कर प्राप्त होतो.

श्री.पाटणी(एलबीटी विभाग):सेलटॅक्स विभागाकडुन माहिती घेण्यात आलेली आहे. शहरात असलेल्या पेट्रोलपंपावरील डिझेल व पेट्रोलवर बृन्हमुंबई, ठाणे, नवि मुंबई महापालिका या ठिकाणी एक्ट्रा वॅट लावलेला होता. तो कशासाठी लावलेला आहे हे स्पष्ट नाही. याच धर्तीवर 1 जुन 2012 व इतर चार महापालिकेत कर लावण्यात आलेला आहे. तीन महापालिकेला माहितीबाबत विचारणा केली आहे.

मा.सभापती :शहर विकासाबाबत शासनाचे उद्देश आहे. शहरात असलेल्या पेट्रोलपंपावरील डिझेल व पेट्रोलवर लावण्यांत येणाऱ्या वॅट मधुन मनपास किती कर प्राप्त होईल. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे/शासनाकडे पत्र व्यवहार तात्काळ करण्यात यावा.

श्री.विजेंद्र जाधव :दोन ए वन असेल तर बी वन करा म्हणुन सांगण्यात येते.

मा.सभापती :या सभागृहाने मनपाच्या हितासाठी निर्णय घेतलेला आहे. परत रेटलिस्ट चालू व्हावे असा उद्देश आहे. किती स.नगरसेवकांचे फोन येतात. अधिकारी म्हणतात दोन ए वन एकत्रित करून बी वन करू. 15 लाखाची विना निविदा खरेदी झालेली आहे. संगणक, 10 युपीएस, 100 टोनर व इरत साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे.

श्री.नारायण कुचे :25 हजाराचे कामासाठी निवीदा करण्यात येते. ए वन असेल तर टेंडर होते. 15 लाख विना निवीदा काम आहे.

भांडार विभाग प्रमुख :भांडार विभागाने 62 लाख रूपये साहित्य खरेदीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेला आहे. सध्या आमची अशी कुठलीही खरेदी झालेली नाही.

लेखाधिकारी(श्री.संजय पवार):औरंगाबाद महानगरपालिकेने शासनाच्या ई गर्व्हर्नर अंतर्गत मागील दिड वर्षापासून डबर एन्ट्रीचे काम होत आहे. मागील दोन वर्षापासून त्याबाबत कोणतेही कामकाज होत नव्हते. 1 एप्रिल 2012 पासून संपूर्ण झ ोन लेखा विभागाला लॅन्ड केलेले आहे. प्रॉपर्टी टॅक्सची रिकव्हरी एका क्लिकवर बघु शकतात. यासाठी या विभागाला जे संगणक आणि जे प्रिन्टरर्स लागले होते. त्यासाठी शासनाच्या आरसीवरती 7 लाख 92 हजाराचे 10 प्रिंटर आणि टोनर घेतलेले आहे. सर्व झोन कार्यालयाला वितरीत करण्यात आलेले आहे. त्यास रितसर प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. 15 लाखाचे काही घेण्यात आलेले नाही.

श्री.समीर राजुरकर :शासनाची आरसी सगळीकडे ट्रिट करतो का?

लेखाधिकारी(श्री.संजय पवार):जिथे जिथे आवश्यक आहे तिथे आरसी वापरली आहे. दोन वर्षात आतापर्यंत महापालिकेत काम झालेले नव्हते. ते काम आम्ही केलेले आहे.

संपुर्ण झोन लॅन्ड करून जोडलेले आहे. त्यांच्या आधारे महापालिकेला 1 लाख 60 हजार मालमत्ता माहित झालेल्या आहेत.

श्री.समीर राजुरकर :निवीदा का काढण्यात आल्या नाही.

लेखाधिकारी(श्री.संजय पवार):आरसीचे रेट हे निवीदा पेक्षाही कमी आहेत. स्टेट लेवलची आरसी आहे.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी या विषयावर तपासणी करून निर्णय घेण्यात यावा.

श्री.मोहन मेघावाले :हडको सिडकोमध्ये दोन दिवसाआड पाणी येत आहे परंतु चार ते पाच दिवस पाणी येत नाही. 100 टक्के मालमत्ता कर सिडको हडकोचे नागरीक भरतात. पुर्वी शहरात रोज पाणी येत होते. परंतु सिडको हडकोच्या नगरसेवकांनी हरकत घेतल्यावर शहरात एक दिवसाआड संपुर्ण शहरात पाणी पुरवठा होत होता परंतु आता चार ते पाच दिवस पाणी येत नाही.

श्री.नारायण कुचे :दोन ते तीन दिवसाआड पाणी येत आहे.

मा.सभापती :याबाबतीत व शहरातील पाणीपुरवठयाबाबत योग्य ते नियोजन करण्यात यावे.

विषय क्र. 12 : (विषय क्र. 08 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 06/07/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

मा.सभापती : विषय क्रमांक 12 स्थगित.

ठराव :

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 13 :

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात रस्ता रूंदीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत रस्ता रूंदीकरणामध्ये येणाऱ्या इमारती जेसीबीद्वारे तोडण्यात येऊन मलबा तातडीने उचलण्यात येत आहे. इमारती पाडतांना आवश्यक जास्त क्षमतेचे टुल्स / मशिनरी मनपाकडे उपलब्ध नसल्यामुळे कामास विलंब होतो तसेच सद्या कार्यरत असलेल्या जेसीबी मशिन्स वारंवार नादुरूस्त होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. सदरील कामे जलदगतीने व योग्य प्रकारे होण्यासाठी अग्निशमन व प्रशासकीय विभागासाठी 13 वा वित्त आयोग अंतर्गत उपलब्ध असलेल्या रू.1.67 कोटी रकमेतुन एक जेसीबी व त्यासोबत आवश्यक उपकरणे खरेदीस मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.683 दिनांक 20/04/2012 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

त्यानुसार सदरील मशिनरीज खरेदीसाठी ई-टेंडरींगद्वारे निविदा सूचना प्रसिध्द करून जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. दोन वेळेस निविदा मागविण्यात आल्या असता निविदाधारकाने अटी शर्ती प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे तिसरी वेळेस निविदा मागविण्यात आल्या असता मे.रत्नप्रभा मोटर्स,औरंगाबाद यांची एकच निविदा प्राप्त झाली आहे. निविदा धारकाने खालीलप्रमाणे दर नोंदविलेले आहेत.

| Sr. No. | Perticulers | Qty. | Estimate Amount | Tender Rate |
|---|---|---|---|---|
| 01 | 4 DX JCB, 4x4 DD | 1 No. | 2678781/- | 2728064/- |
| 02 | Disk cutter and Hoses | 1 set | 366470/- | 378966/- |
| 03 | H. M. 380 Rock Breaker | 1 set | 641858/- | 654696/- |
| 04 | G.A.Earth Dill | 1 set | 368242/- | 379851/- |
| 05 | Ditch cleaning bucket | 1 No. | 46809/- | 47289/- |
| | | Total Rs. | 4102160/- | 41,88,866/- |

उपरोक्त प्रमाणे जेसीबी व संलग्न उपकरणे पुरवठा कामासाठी निविदा धारकाने नोंदविलेले दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा रक्कम रूपये 86706/- ने जास्त आहेत. निविदा धारकास वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता एक्साईज ड्युटी मध्ये 2 टक्के वाढ झालेली असल्यामुळे वाढीव दराने निविदा दाखल केली असल्याचे कळविले आहे. निविदेतील दरानुसार मशिनरी खरेदीस रक्कम रूपये 4188866/- खर्च येतो. तरी मे.रत्नप्रभा मोटर्स औरंगाबाद यांचे निविदेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 13 नामंजूर.

ठराव :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांत आला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

विषय क्र. 14 :

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.महापौर, मा.उपमहापौर व इतर स.पदाधिकारी यांच्या वापरासाठी महानगरपालिकेतर्फे वाहन पुरविण्यात येते. स.पदाधिकारी यांनी स्वतःचे वाहन वापरल्यास त्यासाठी त्यांना मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 12 दिनांक 29/06/2005 नुसार मंजुर केलेली समकक्ष रक्कम देण्यात येते.

विद्यमान महापौर महोदया सध्या स्वतःचे वाहन वापरत आहे परंतु भविष्यात त्यांनी स्वतःचे वाहन वापरणे ऐवजी महानगरपालिकेच्या वाहनाची मागणी केल्यास त्यांना चांगल्या स्थितीतील वाहन पुरवावे लागेल. मा.महापौर यांचेसाठी असलेल्या वाहनाचा वापर जास्त प्रमाणात असल्यामुळे व पेट्रोल वाहन वापरासाठी येणारा खर्च लक्षात घेता डिझेल कार पुरविणे योग्य होईल. सध्या महानगरपालिकेकडे चांगल्या स्थितीतील डिझेल कार उपलब्ध नाही, त्यामुळे नविन डिझेल कार खरेदी करणे योग्य होईल.

नविन डिझेल ॲम्बेसेडर कार खरेदीसाठी मे.हिंदुस्थान मोटार्स लि. कंपनीचे शासकीय दरानुसार असलेल्या दरपत्रकाप्रमाणे एकुण रक्कम रूपये 5,94,749/- च्या खर्चास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

| अ.क्र. | तपशिल | एकूण रक्कम |
|---|---|---|
| 01. | ॲम्बेसिडर गॅन्ड 2000<br>DS-2 BU AC PS PW<br>C2 CBS-37 Na<br>Redial tyres colour crystal White | 5,94,749/- |

तरी वरीलप्रमाणे एक ॲम्बेसेडर कार शासकीय दराने मे.हिंदुस्थान मोटार्स यांचेकडुन खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रूपये 5,94,749/- च्या खर्चा बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 14 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.महापौर यांचेसाठी नविन डिझेल ॲम्बेसेडर कार खरेदीसाठी मे.हिंदुस्थान मोटार्स लि. कंपनीचे शासकीय दरानुसार असलेल्या दरपत्रकाप्रमाणे एकुण रक्कम रूपये 5,94,749/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 15 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका प्रशासकीय कार्यालयाचे टप्पा क्र.(3) चे आवारात असलेली श्री.मुराद खान मेहबुब खान यांची कॅन्टीन हटविण्याची कार्यवाही संबंधाने न्याय प्रविष्ठ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सादर अवमान याचिका संबंधाने या प्रकरणीचे विधिज्ञ यांचे अभिप्रायानुसार संबंधीतांना पर्यायी जागा देण्याच्या कार्यवाही अंतर्गत संबंधीतास प्रशासकीय इमारत टप्पा क्र. (2) च्या पार्कीग गेटच्या बाजूस असलेली रूम प्रस्तावित आहे. सदर जागा संबंधीतांना देण्यापूर्वी सदर जागेसाठी भाडे निश्चित करणे, तद्नंतर करारनामा करून जागेचा ताबा देणे इ. ची कार्यवाही करण्यात येईल असे मा.न्यायालयास अवगत केलेले आहे. ह्या जागेसाठी होणारे भाडे या वर्षाचे आर. आर. दरानुसार मासिक भाडे रक्कम रू.1132/- एवढे होते.

**करीता वर प्रस्तावित केलेली जागा संबंधीतास मासिक भाडे रक्कम रू.1132/- ने इतर नेहमीच्या अटी/शर्तीस अधिन राहुन देण्यासाठीचा सदर प्रस्ताव मा.न्यायप्रविष्ठ प्रकरणा संबंधाने विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 15 मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका प्रशासकीय कार्यालयाचे टप्पा क्र.(3) चे आवारात असलेली श्री.मुराद खान मेहबुब खान यांची कॅन्टीन हटविण्याची कार्यवाही संबंधाने न्याय प्रविष्ठ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सादर अवमान याचिका संबंधाने या प्रकरणीचे विधिज्ञ यांचे अभिप्रायानुसार संबंधीतांना पर्यायी जागा देण्याच्या कार्यवाही अंतर्गत संबंधीतास प्रशासकीय इमारत टप्पा क्र. (2) च्या पार्कींग गेटच्या बाजूस असलेली (रूम) जागा संबंधीतास मासिक भाडे रक्कम रू.1132/- ने इतर नेहमीच्या अटी/शर्तीस अधिन राहुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**